प्रेसनोट

दिनांक –३०/०१/२०२४

"मंडळ अधिकारी, कोने, ता.वाडा व तलाठी सजा कोने,ता.वाडा यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी लाच स्विकारताना ताब्यात घेतले बावत".

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद कमांक | वाडा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.किरण शंकर राठोड, वय ४७ वर्षे, मंडळ अधिकारी, कोने, ता.वाडा जि. पालघर, (वर्ग–३)<br>२) श्रीमती चैत्राली किशोर कुटे, वय ३४ वर्षे, तलाठी सजा कोने, ता. वाडा जि. पालघर (वर्ग–३) |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | आलोसे क्र. १ साठी २५,०००/–रूपये.<br>आलोसे क्र. २ साठी ५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | आलोसे क्र. १ यांनी २५,०००/–रूपये.<br>आलोसे क्र. २ यांनी ५,०००/–रूपये. |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांच्या वडीलांच्या मालकीच्या जमिनीच्या सातबारावरील मयत नातेवाईकांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे नोंदविण्यासाठी तक्रारदार यांनी आलोसे क्र.२ यांच्याकडे अर्ज केलेले होते. तसेच तक्रारदार यांच्या चुलत भाऊ –वहिणीच्या जमिनीच्या सातबारावरील नावामध्ये बदल करण्यासाठी तक्रारदार यांनी तहसिलदार वाडा यांच्या कार्यालयात केलेल्या अर्जाची चौकशी आलोसे क्र.१ यांच्याकडे आहे. नमुद प्रमाणे दोन्ही कामे करण्यासाठी आलोसे क्र. १ यांनी त्यांच्या स्वतःसाठी ३०,०००/– रू. व आलोसे क्र.२ यांच्यासाठी ५,०००/–रू. लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक २९/०१/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाकडे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.३०/०१/२०२४ रोजी पंचासमक्ष आलोसे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे यांची पडताळणी केली असता, तक्रारदार यांची वरील नमुद दोन्ही कामे करण्यासाठी आलोसे क्र. १ यांनी तडजोडीअंती स्वतःसाठी तक्रारदार यांच्याकडून २५,०००/–रूपये, व आलोसे क्र.२ यांचेसाठी ५,०००/– रू. लाचेची मागणी करून त्याप्रमाणे आलोसे क्र. १ यांनी आज दिनांक ३०/०१/२०२४ रोजी १६:२१ वा. तक्रारदार यांचेकडून २५,०००/–रू. हॉटेल कोकण किनारा कोने, ता.वाडा याठिकाणी आणि आलोसे क्र. २ यांनी १६:३८ वा. तक्रारदार यांचेकडून ५,०००/–रू. स्वतःचे तलाठी सजा कोने, ता.वाडा येथील कार्यालयात दोन्ही पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारली असता दोन्ही आलोसे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– —
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9423884745, 9404218543

(दयानंद गावडे) ३०/१/२४
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर